Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840. R- 2334141

शाअमविऔ/अंतगुणहमीकक्ष/२०२१-२२/ दिनांक : ०५ सप्टेंबर २०२१

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ) अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १६ सप्टेंबर २०२१ रोजी होणाऱ्या बैठकीची विषय पत्रिका : बैठक-१

१. मागील वर्षीच्या अंतिम सभेच्या इतिवृत्तास व कार्यवृत्तास मान्यता देणे.
२. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाच्या दिनदर्शिकेला (Academic Calendar ला) मान्यता देणे.
३. गत वर्षीच्या निकालाचा आढावा घेणे.
४. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी शैक्षणिक कार्यभार वाटप करणे.
५. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विविध विभाग, सहशालेय कार्यक्रमांचे वितरण करणे.
६. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विविध समित्यांचे गठण करून त्यावर विद्यार्थी प्रतिनिधींची नियुक्ती करणे.
७. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विविध कृतिसत्रे, प्रात्याक्षिके इ. साठी Budgetting आर्थिक तरतूद नियोजन करणे.
८. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या नियुक्तीचे / placement चे प्रमाण वाढविण्यावर विचार करणे.
९. प्रलंबित AQARs ची माहिती online नवीन format मध्ये भरण्याबाबत आढावा घेणे.
१०. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Dr. S. S. Muley
प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org Email ID: govtiase@gmail.com

Principal & Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ )
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १६ सप्टेंबर २०२१ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक १६ सप्टेंबर २०२१ रोजी अंतर्गत गुणवत्ता कक्षात (IQAC Cell) मा. प्राचार्य तथा IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष डॉ एस एस मुळे यांचे अध्यक्षतेखाली सहविचार कोविड नियमावलीचे पालन करत सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ. यु.जे.करवंदे यांनी IQAC अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ एस एस मुळे यांचे व उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले व त्यानंतर सन २०२०-२१ च्या अंतिम सभेचे इतिवृत्त व कार्यवृत्त वाचून दाखवण्यात आले. आणि सर्वानुमते ते कायम करण्यात आले.

२. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ च्या Academic Calendar ला मान्यता देण्यात आली.

३. एप्रिल / मे २०२१ च्या उन्हाळी परीक्षा नुकतीच १५ सप्टेंबर २०२१ पासून online पद्धतीने सुरु झाल्याने या परीक्षेचा निकालाची चर्चा पुढील बैठकीत व्हावी असे ठरले.

४. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांमध्ये बी.एड. द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमातील सर्व पेपर्स, प्रात्यक्षिके, कृतिसत्रे व एम.एड. तृतीय सत्राच्या अभ्यासक्रमातील सर्व भाग व महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे वाटप करण्यात आले.

५. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विविध समित्यांचे गठण करण्यात आले व त्यावर विद्यार्थी प्रतिनिधींची नियुक्ती अंतिम करण्यात आली.

६. मागील प्रलंबित AQAR अंशत: online भरण्यात आल्याचे त्या-त्या criteria शी संबंधित प्राध्यापकांनी प्रस्तुत/सादर केले.

७. वरील मुद्दा (६) च्या अनुषंगाने अडचणींवरील (staff बदल्या) उपायांची चर्चा करण्यात आली आणि मागील AQARs तातडीने पूर्ण करण्यात यावेत असे ठरले.

८. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध कृतिसत्रे, प्रात्यक्षिके यासाठी आर्थिक नियोजन अंतिम करून तरतुदीस मान्यता देण्यात आली.

९. महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींचे placement चे प्रमाण वाढविण्यासाठी TET प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावे असे ठरले.

१०. IQAC ची पुढील बैठक नोव्हेंबर महिन्यात आयोजित करण्यात यावी असे ठरले.

शेवटी मा. अध्यक्षाच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| | Dr. S.S. Muley |
| IQAC समन्वयक | प्राचार्य तथा संचालक |
| शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद | शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद |

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२)**
**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)**

**दिनांक १६ सप्टेंबर २०२१ : सहविचार सभेतील उपस्थित सदस्य**

1. डॉ.संजीवनी मुळे. (अध्यक्ष )
2. मा.डॉ. श्री. रणजित सिंह निंबाळकर (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य
3. प्रा.डॉ.एन.आर.चौंडेकर
4. प्रा.डॉ.बी.पी.सुभेदार
5. प्रा.डॉ.आर.एस.पद्मे
6. प्रा.डॉ.जी.एम.गायकवाड
7. प्रशासनातील व्यक्ती श्रीम.वंदना अंभोरे (ग्रंथपाल)
8. प्रशासनातील व्यक्ती श्री.नितीन घोडके (वसतिगृह अधीक्षक )
9. प्रशासनातील व्यक्ती श्रीम. दवणे (वरिष्ठ लिपिक )
10. समाजातील नामनिर्देशित व्यक्ती / प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ
11. विद्यार्थी प्रतिनिधी– कु. संपदा लोळगे (बी.एड.)
12. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. श्रद्धा शेळके (एम.एड.)
13. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- श्री निलेश आरके (प्राचार्य, सम्यक क.महावि.)
14. उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी- श्रीम.ज्योती दाशरथी
15. भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी– डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे (शाळा प्रतिनिधी)
16. IQAC समन्वयक –प्रा. डॉ. यु.जे.करवंदे

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840. R- 2334141

## दिनांक १६ सप्टेंबर २०२१ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार कार्यवृत्त अहवाल (ATR )

दिनांक १६ सप्टेंबर २०२१ च्या IQAC बैठकीतील ठरल्याप्रमाणे प्रत्येकाने आपणाकडे देण्यात आलेल्या AQAR संबंधी माहिती data गोळा करण्याचे कार्य पूर्ण केले. नवीन format मध्ये प्रत्यक्ष online माहिती भरण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु केले.

नियोजित आर्थिक तरतुदीनुसार प्रशिक्षणार्थ्यांसाठी विविध प्रात्याक्षिके आणि कार्यशाळा यासाठी विविध journals ची छपाई करण्यात आली आणि त्यांचे वितरण करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नियुक्तीचे प्रमाण वाढविण्यासाठी दिनांक २१-२२ ऑक्टोबर २०२१ दरम्यान राज्यस्तरीय TET परीक्षा तयारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले.

अशाप्रकारे दिनांक १६ सप्टेंबर २०२१ च्या IQAC बैठकीतील ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

**NAAC "A" Grade Re-accredited**

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840. R- 2334141

शाअमविऔ/अंतगुणहमीकक्ष/२०२१-२२/ दिनांक ०८ नोव्हेंबर २०२१

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ) अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजी होणा-या बैठकीची विषय पत्रिका : बैठक-२

१. मागील सभेच्या इतिवृत्तास व कार्यवृत्तास मान्यता देणे.

२. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या परीक्षेच्या निकालाचा आढावा घेणे.

३. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ द्विवतीय वर्षासाठी छात्रसेवाकालाचे नियोजन करणे.

४. नवीन format मध्ये प्रलंबित AQARs ची online भरलेल्या माहिती / प्रारुपावर चर्चा करून त्यास NAAC कडे online submit करण्यासाठी अंतिम मान्यता देणे.

५. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840. R- 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२)

## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)

### दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षात (IQAC Cell) IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष तथा प्राचार्यांचे अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ.यु.जे.करवंदे यांनी अध्यक्ष व उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले व तदनंतर मागील सभेचे इतिवृत्त आणि कार्यवृत्त वाचून दाखवण्यात आले व ते कायम करण्यात आले.

२. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या परीक्षेच्या निकालाचा आढावा घेण्यात आला. बी.एड. द्वितीय वर्ष वर्गाचा निकाल 96.56% लागला; त्यापैकी सर्व विद्यार्थी Distinction मध्ये उत्तीर्ण झाल्यामुळे समाधान व्यक्त करण्यात आले.

३. कोविड-१९ च्या परिस्थितीत वेळोवेळी झालेले Lockdown व त्यामुळे मागे पडलेले प्रलंबित AQARs सदर बैठकीत IQAC समोर मान्यतेस्तव सादर करण्यात आले. हे AQARs किरकोळ दुरुस्तीसह NAAC कडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी आवश्यक त्या पुराव्यांची जुळवाजुळव एका महिन्यात करावी असे ठरले.

४. द्वितीय वर्ष बी.एड. वर्गाचे प्रथम वर्ष बहुतांशी online झाल्याने द्वितीय वर्षातील छात्रसेवाकालाचे अधिक कठोरपणे आयोजन व कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. या अनुषंगाने विविध ५ शाळांत ५ गटात विद्यार्थ्यांचे विभाजन करण्यात येऊन ४ महिन्यांच्या छात्रसेवाकालाचे नियोजन अंतिम करण्यात आले.

५. ऐन वेळचा विषय म्हणून बी.एड. प्रथम वर्ष २०२१-२२ चे प्रवेश डिसेंबर २०२१ ते फेब्रुवारी २०२२ दरम्यान नियोजित असल्याचे विचारात घेता प्रवेश समितीचे गठण

करण्यात आले. तसेच प्रवेशानंतरच्या शैक्षणिक कृतिसत्रांचे नियोजन अंतिम करण्यात आले.

शेवटी मा. अध्यक्षाच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.श्री.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ )**
**अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)**

**दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ : सहविचार सभेतील उपस्थित सदस्य**

1. डॉ. संजीवनी मुळे. (अध्यक्ष )
2. डॉ.श्री.रणजित सिंह निंबाळकर (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य
3. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक - प्रा. डॉ. एन.आर.चौंडेकर
4. प्रा. डॉ. सुभेदार बी.पी.
5. प्रा. डॉ. एस.आर.पद्मे
6. प्रा. डॉ. जी.एम.गायकवाड
7. प्रशासनातील व्यक्ती श्रीम. वंदना अंभोरे (ग्रंथपाल)
8. प्रशासनातील व्यक्ती श्री.नितीन घोडके (वसतिगृह अधीक्षक )
9. प्रशासनातील व्यक्ती श्रीम. दवणे (वरिष्ठ लिपिक)
10. समाजातील एक नामनिर्देशित व्यक्ती/प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ
11. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. संपदा लोळगे (बी.एड.)
12. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. श्रद्धा शेळके (एम.एड.)
13. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- श्री. निलेश आरके, प्राचार्य, सम्यक क.महाविद्यालय
14. एक नियोक्ता (Employer) प्रतिनिधी
15. एक उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी- श्रीम.ज्योती दाशरथी
16. एक भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी–डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे
17. IQAC समन्वयक –प्रा.डॉ.श्री. यु.जे. करवंदे

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ )**
**अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)**

**दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा**

**कार्यवाहीचा कार्यवृत्त ATR अहवाल :**

दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ च्या IQAC बैठकीतील ठरावाप्रमाणे सन २०१४-१५, सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० ह्या सर्व प्रलंबित AQARs मध्ये सूचविलेल्या सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर IQAC Co-ordinator समन्वयक प्रा.डॉ.श्री.ऊर्जित जनार्दन करवंदे यांनी प्रथम सन २०१४-१५ चा AQAR हा NAAC च्या वेबसाईट वर upload केला. सन २०१५-१६ च्या AQAR साठीची लिंक NAAC कडून देण्यात न आल्याने तो महाविद्यालयाच्या website वर upload करण्यात आला. नंतर या AQAR सन २०१५-१६ ची लिंक NAAC कडून मिळण्यासाठी Help Desk शी संपर्क करण्यात येऊन काही दिवस लिंक मिळते का? याची वाट पहिली; तथापि NAAC कडून शेवटच्या ५ वर्षांच्याच AQARs चा विचार होईल असे कळविण्यात आल्याने सदर बैठकीतील निर्णयाप्रमाणे पुढील सन २०१६-१७, सन २०१७-१८, २०१८-१९ या AQARs चे NAAC च्या पोर्टलवर online submission करण्यात आले. नोव्हेंबर २०२० पर्यंत सन २०१९-२० साठीच्या AQAR च्या नवीन Format मधील लिंक उपलब्ध नव्हती. दरम्यान त्या पूर्वीच्या online submit केलेल्या सर्व AQARs मध्ये NAAC कडून तपासणी नंतर काही किरकोळ सुधारणा सूचित करण्यात आल्या; त्यांची पूर्तता करण्यात येऊन त्यानुसार Edited सुधारित AQARs पुन्हा NAAC कडे सदर करण्यात आले.

शासनाकडून वेळोवेळी कोविड विषयक येणाऱ्या आदेश / मार्गदर्शक सूचनांचे पालन करत तसेच IQAC बैठकीतील ठरावाप्रमाणे बी.एड. द्वितीय वर्ष सन २०२१-२२ च्या विद्यार्थ्यांसाठी मान्य नियोजनाप्रमाणे छात्रसेवाकालाची अतिशय काटेकोरपणे आणि समृद्ध अनुभवप्राप्त होईल अशाप्रकारे छात्रासेवाकालीन विविध उपक्रमांची तसेच सराव पाठांची कार्यवाही पाच विविध प्रकारच्या शाळांत करण्यात आली.

डिसेंबर २०२१ मध्ये एम.एड. प्रथम वर्ष आणि जानेवारी २०२२ मध्ये बी.एड. प्रथम वर्ष या वर्गांच्या प्रवेशासाठी स्वतंत्रपणे आदेश काढून प्रवेश समितीचे गठण करण्यात आले. CET Cell, Govt of Maharashtra आणि उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे निर्देशानुसार वैधानिक – सामाजिक आरक्षणाचे तसेच प्रवेश प्रक्रियेच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करत अत्यंत पारदर्शकपणे प्रवेश प्रक्रिया संपन्न करण्यात आली. प्रवेश प्रक्रिया दिनांक २–३ मार्च २०२२ पर्यंत लांबल्यामुळे विविध कृतिसत्रांचे नियोजन पुढील बैठकीत करण्यात यावे असे ठरले.

बैठकीतील कार्य–विभाजनाप्रमाणे सर्व प्राध्यापकांनी विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचा कार्यभार स्विकारून अनुषंगिक कार्यवाही केली.

अशा प्रकारे १५ नोव्हेंबर २०२१ च्या IQAC च्या बैठकीतील निर्णय आणि ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली.

| | |
|---|---|
| | Dr. S. S. Muley |
| IQAC समन्वयक | प्राचार्य तथा संचालक |
| शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद | शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद |

Principal
Govt. College of Education
Aurangabad

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840, R- 2334141

शाअमविऔ/अंतर्गतगुणवत्ताहमीकक्ष/२०२१-२२/ दिनांक : २६ फेब्रुवारी २०२२.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद.
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)
## (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ : बैठक-३)

**दिनांक ०४ मार्च २०२२ रोजी होणा-या बैठकीची विषय पत्रिका**

१. मागील सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

२. त्यानुसार कार्यवृत्तास (Action Taken Report ATR) मान्यता देणे.

३. शासनाकडून वेळोवेळी कोविड विषयक येणाऱ्या आदेश / मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन बी.एड. व एम.एड. प्रथम वर्ष २०२१-२२ च्या अभ्यासक्रमानुसार विविध कृतिसत्रे / शैक्षणिक उपक्रमांचे पुनर्नियोजन करणे.

४. बी.एड. (द्वितीय वर्ष) अभ्यासक्रमातील EPC-4 स्व-संकल्पना आकलन आणि EPC-5 शिक्षणातील नाट्य व कला यांचे नियोजन आणि कार्यवाही निश्चित करणे.

५. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Dr. S. S. Muley
प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

**Govt. College of Education, IASE, Aurangabad.**

**NAAC "A" Grade Re-accredited**

**Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.**

**Dr.S.S.Muley** **Website: iaseaurangabad.org. Email : govtiase@gmail.com**

**Principal & Director** **Off-Tele-Fax:** 0240-2334840 , **R-** 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ )
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC Cell)
## दिनांक ०४ मार्च २०२२ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक ०४ मार्च २०२२ रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाद्वारे (IQAC Cell) मा. प्राचार्य तथा IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत विषय पत्रिकेनुसार चर्चा करण्यात आली आणि खालील प्रमाणे ठराव घेण्यात आले.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ.यु.जे.करवंदे यांनी अध्यक्ष व सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले व तद्नंतर १५/११/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखवण्यात आले व त्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
२. मागील बैठकीतील ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ATR सादर करण्यात आला.
३. बी.एड. सन २०२१-२२ साठी क्षमतेनुसार प्रथम वर्ष वर्गात संपूर्ण ५० प्रवेश संपन्न झाले; आणि EWS संवर्गासाठी ५ पैकी ५ प्रवेश संपन्न झाले. मात्र एम.एड. वर्गासाठी ५० पैकी ०८ प्रवेश संपन्न होऊ शकले; आणि EWS संवर्गासाठी एकही उमेदवार उपलब्ध झाला नाही. सर्वत्रच एम.एड. प्रवेशाची परिस्थिती अशा प्रकारची असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.
४. एम.एड. व बी.एड. प्रथम वर्ष २०२१-२२ ची प्रवेश प्रक्रिया (२-३ मार्च २०२२ पर्यंत) बरीच लांबल्याने मागील बैठकीतील नियोजित अध्यापनशास्त्रीय चित्रकला कृतिसत्र, हस्तकला कृतिसत्र, शैक्षणिक साहित्य निर्मिती कृतिसत्र, सूक्ष्म-अध्यापन कृतिसत्र इत्यादी कृतिसत्रे / शैक्षणिक उपक्रमांचे पुनर्नियोजन करण्यात आले.
५. शासनाकडून वेळोवेळी कोविड विषयक येणाऱ्या आदेश / मार्गदर्शक सूचनांचे पालन करत सुरु असलेल्या द्वितीय वर्षातील छात्रसेवाकालाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.
६. बी.एड. द्वितीय वर्ष अभ्यासक्रमातील EPC-4 आणि EPC-5 ही प्रात्यक्षिके विद्यापीठाचे निर्देशान्वये offline पद्धतीने घेण्यात यावीत असे ठरले. स्व-संकल्पना आकलन या प्रात्यक्षिकाचे समन्वयन डॉ.बी.पी.सुभेदार यांनी करावे असे सूचित करण्यात आले. तसेच

समन्वयक डॉ.आर.एस.पद्मे यांनी नाट्य आणि कला या प्रात्यक्षिकाचे प्रा.श्री.भागवत यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली नियोजित करावे असे ठरले.

७. ऐन वेळचा विषय म्हणून, नुकतेच कोविड परिस्थितीतून सर्व सावरत असतांना आरोग्य विषयक अनेक तक्रारी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर सर्व छात्राध्यापक आणि सर्व स्टाफ सदस्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात अयावे असा निर्णय घेण्यात आला.

शेवटी IQAC ची पुढील सहविचार सभा मे-जून २०२२ मध्ये आयोजित करण्यात यावी, असे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी नमूद केले आणि त्यांच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Dr. S. S. Muley
प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ )**

**अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)**

**दिनांक ०४ मार्च २०२२ : सहविचार सभेसाठी उपस्थित सदस्य**

1. डॉ. संजीवनी मुळे (अध्यक्ष)

2. मा. डॉ.श्री. रणजित सिंह निंबाळकर (सहसंचालक) व्यवस्थापन समिती सदस्य

3. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक - डॉ. एन.आर.चौंडेकर

4. प्रा. डॉ. सुभेदार बी.पी.

5. प्रा. डॉ. एस.आर.पद्मे

6. प्रा. डॉ. जी.एम.गायकवाड

7. प्रशासनातील व्यक्ती श्रीम.वंदना अंभोरे (ग्रंथपाल)

8. प्रशासनातील व्यक्ती श्री.नितीन घोडके (वसतिगृह अधीक्षक )

9. प्रशासनातील व्यक्ती श्रीम.दवणे (वरिष्ठ लिपिक )

10. समाजातील एक नामनिर्देशित व्यक्ती/प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ

18. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. संपदा लोळगे (बी.एड.)

19. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. श्रद्धा शेळके (एम.एड.)

20. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- श्री. निलेश आरके, प्राचार्य, सम्यक क.महाविद्यालय

11. एक नियोक्ता Employer प्रतिनिधी -

12. एक उद्योगपती (Industrialist) प्रतिनिधी - श्रीम.ज्योती दाशरथी

13. एक भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी - डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे

14. IQAC समन्वयक - प्रा.डॉ.श्री. यु.जे. करवंदे

**दिनांक ०४ मार्च २०२२ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा**

**कार्यवृत्त ATR अहवाल :**

दिनांक ०४ मार्च २०२२ रोजी संपन्न झालेल्या IQAC च्या बैठकीतील ठरावाप्रमाणे शैक्षणिक उपक्रमांचे पुनर्नियोजन करण्यात येऊन दिनांक १४ ते (१८) १९ फेब्रुवारी २०२२ दरम्यान अभ्यासक्रम उद्बोधन Orientation सत्र Offline आयोजित करण्यात आले. पुन्हा शासन निर्देशाप्रमाणे काही दिवस online वर्ग घेतले गेले. यामुळे दि. ०१ ते ०४ मार्च २०२२ दरम्यान अध्यापनशास्त्रीय दृष्टीकोनातून शैक्षणिक साहित्य ही संकल्पना स्पष्ट करत एक चित्रकला-हस्तकला लघु-कृतिसत्र घेण्यात आले.

त्यानंतर लगोलग प्रा.डॉ.जी.एम.गायकवाड यांनी दिनांक ०५ ते २३ मार्च २०२२ दरम्यान सूक्ष्म-अध्यापन कृतिसत्र आयोजित केले. त्याला जोडूनच प्रा.डॉ.एन.आर.चोंडेकर यांनी तज्ज्ञ Guest Faculty बोलावून चित्रकला-हस्तकला कृतिसत्र आयोजित केले; ज्यात सर्व छात्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविधांगी शैक्षणिक साहित्य तयार केले.

त्या नंतर दिनांक ०४ ते ०७ एप्रिल २०२३ दरम्यान प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी मूल्यमापन कृतिसत्राचे आयोजन केले; ज्याच्या आधारे सर्वात महत्वाच्या पाठ नियोजनाचा पाया घातला गेला. पुढे पाठ दिग्दर्शन कृतिसत्र आणि पाठ नियोजन कृतिसत्र संपन्न झाले.

बी.एड. द्वितीय वर्ष वर्गाचा छात्रसेवाकाल डॉ.बी.पी.सुभेदार यांचे नियोजनाप्रमाणे संपन्न झाला. त्या नंतर १२-१३ मे २०२२ दरम्यान EPC-4 Understanding the Self या कृतिसत्रात तज्ज्ञ प्रा.श्री.भागवत या तज्ज्ञ व्याख्यात्याचे व्याख्यान कार्यशाळेत आयोजन करण्यात आले.

याच प्रकारे प्रा.डॉ.आर.एस.पद्मे यांनी EPC-5 Drama & Arts in Education या कृतिसत्राचे समन्वयक या नात्याने तज्ज्ञ प्रा.श्री.भागवत यांचे माध्यमातून हे प्रात्यक्षिक / कृतिसत्र यशस्वीरीत्या संपन्न केले.

दिनांक ०१ एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालयात सर्व छात्राध्यापक, प्राचार्य, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांचेसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यातून काही सदस्यांना पुढील उपचारासाठी हॉस्पिटलकडे रेफर करण्यात आले.

विद्यापीठाचे संभाव्य Annual Exam Schedule लक्षात घेता साधारणतः २०२२ च्या जुलै / ऑगस्ट दरम्यान घेता येईल अशाप्रकारे पुढील बैठकीचे नियोजन करण्यात आले.

अशा प्रकारे IQAC बैठकीतील निर्णय आणि ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr. S. S. Muley Website: iaseaurangabad.org. Email ID: govtiase@gmail.com

Principal&Director Off-Tele-Fax: 0240-2334840. R- 2334141

शाअमविऔ/अंतर्गतगुणवत्ताहमीकक्ष/२०२१-२२/ दिनांक : २७ जून २०२२.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद.
## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)
## (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ : बैठक-४)

दिनांक ०१ जुलै २०२२ रोजी होणा-या बैठकीची विषय पत्रिका

१. मागील सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

२. त्यानुसार कार्यवृत्तास (Action Taken Report ATR) मान्यता देणे.

३. बी.एड. व एम.एड. प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष २०२१-२२ च्या अभ्यासक्रमाची पूर्तता, अंतर्गत मूल्यमापन इ.चा आढावा घेणे.

४. मागील AQAR 2020-21 च्या पूर्ततेचा आढावा घेणे.

५. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Dr. S. S. Muley
प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad

Govt. of Maharashtra

# Govt. College of Education, IASE, Aurangabad.

NAAC "A" Grade Re-accredited

Padampura, Station Road, Near Deogiri College, Aurangabad (M.S)- 431005.

Dr.S.S.Muley Website: iaseaurangabad.org. Email : govtiase@gmail.com

Principal & Director Off-Tele-Fax: 0240-2334840 , R- 2334141

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२)

## अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC Cell)

## दिनांक ०१ जुलै २०२२ रोजी संपन्न झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त

आज दिनांक ०१ जुलै २०२२ रोजी अंतर्गत गुणवत्ता कक्षाद्वारे (IQAC Cell) मा. प्राचार्य तथा IQAC Cell चे पदसिद्ध अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली सहविचार सभा घेण्यात आली. या सहविचार सभेत विषय पत्रिकेनुसार चर्चा करण्यात आली आणि खालील प्रमाणे ठराव घेण्यात आले.

१. सभेच्या प्रारंभी IQAC समन्वयक डॉ.यु.जे.करवंदे यांनी अध्यक्ष व सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले.

२. त्यानंतर ०४/०३/२०२२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ATR वाचून दाखवण्यात आले व त्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

३. ऑगस्ट २०२२ मध्ये विद्यापीठाच्या (एप्रिल/मे २०२२ च्या) उन्हाळी परीक्षा नियोजित असल्याने बी.एड. व एम.एड. वर्गाच्या तात्विक भागाचे अध्यापन आणि प्रात्यक्षिक भाग समाधानकारकपणे संपन्न झाल्याचे तसेच विद्यापीठ निकषानुसार अंतर्गत मूल्यमापन संपन्न झाल्याचे संबंधित प्राध्यापकांनी तसेच विभाग प्रमुखांनी प्रतिपादन केले.

४. मागील AQAR २०२०-२१ ची बरीचशी माहिती तयार असून उर्वरित माहितीची लवकरात लवकर पूर्तता करावी असे ठरले.

५. पुढील वर्षीची पहिली बैठक सप्टेंबर २०२२ मध्ये घ्यावी व त्यात अकॅडेमिक कॅलेंडर सादर करावे असे ठरले.

शेवटी मा.अध्यक्षाच्या परवानगीने सहविचार सभेची सांगता झाली. NAAC समन्वयक प्रा.डॉ.यु.जे.करवंदे यांनी सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर सभेला पुढील सदस्य उपस्थित होते.

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Dr. S. S. Muley
प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,IASE, औरंगाबाद (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ )**
**अंतर्गत गुणवत्ता कक्ष** (IQAC Cell)

**दिनांक ०१ जुलै २०२२ : सहविचार सभेसाठी उपस्थित सदस्य**

१. डॉ. संजीवनी मुळे. **(अध्यक्ष )**

२. मा.डॉ.श्री.रणजितसिंह निंबाळकर (सहसंचालक) **व्यवस्थापन समिती सदस्य**

३. प्रा. डॉ. एन.आर.चौंडेकर

४. प्रा. डॉ. सुभेदार बी.पी.

५. प्रा. डॉ. एस.आर.पद्मे

६. प्रा. डॉ. जी.एम.गायकवाड

७. श्रीम. वंदना अंभोरे (ग्रंथपाल)

८. श्री. गणेश चव्हाण (मुख्य लिपिक)

९. श्रीम. दवणे (वरिष्ठ लिपिक )

१०. समाजातील एक नामनिर्देशित व्यक्ती/प्रतिनिधी - डॉ. निवेदिता सराफ

११. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. संपदा लोळगे (बी.एड.)

१२. विद्यार्थी प्रतिनिधी – कु. श्रद्धा शेळके (एम.एड.)

१३. माजी विद्यार्थी प्रतिनिधी- श्री. निलेश आरके, प्राचार्य, सम्यक क.महाविद्यालय

१४. नियोक्ता(Employer)प्रतिनिधी – ~~डॉ.बी.बी.चव्हाण~~(शिक्षणाधिकारी माध्य)

१५. एक उद्योगपती(Industrialist) प्रतिनिधी – श्रीम.ज्योती दाशरथी

१६. एक भागधारक (Stakeholder) प्रतिनिधी - डॉ. श्रीम.क्रांती डांगे/मुळे

१७. IQAC समन्वयक –प्रा.डॉ.यु.जे.करवंदे

दिनांक ०१ जुलै २०२२ च्या IQAC बैठकीतील निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा कार्यवृत्त ATR अहवाल :

दिनांक ०१ जुलै २०२२ ची IQAC बैठक ही शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ची अंतिम बैठक असल्याने त्यात प्रमुख्याने संपन्न झालेल्या वर्षाचा आढावा, हेच प्रमुख कामकाज झाले. तसे त्यात झालेल्या अन्य ठरावाप्रमाणे IQAC Co-ordinator प्रा.डॉ.श्री.ऊर्जित जनार्दन करवंदे यांनी प्रलंबित AQAR २०२०-२१ च्या कार्याला गती देण्यासाठी सातत्याने व नियमितपणे त्या त्या criteria शी संबंधित प्राध्यापकाकडे पाठपुरावा करण्यात आला.

विद्यापीठ परीक्षा संपन्न झाल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षाचे Academic Calendar चे प्रारूप पुढील बैठकीत ठेवता येईल या दृष्टीने नियोजन व कार्यवाही करण्यात आली. तसेच साधारणत: २०२२ च्या सप्टेंबरच्या पहिल्या / दुसऱ्या सप्ताहादरम्यान घेता येईल अशाप्रकारे IQAC च्या पुढील वर्षीच्या पहिल्या बैठकीचे नियोजन करण्यात आले.

अशा प्रकारे ०१ जुलै २०२२ च्या IQAC च्या बैठकीतील निर्णय आणि ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली.

Dr. S. S. Muley

IQAC समन्वयक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

प्राचार्य तथा संचालक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, IASE, औरंगाबाद

Principal
Govt. College of Education
Aurangabad.